क्र.२/नसवि/प्रशासक/०६/२०२४-२०२५
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- ०२ ऑगस्ट २०२४

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका
प्रशासक सभा क्रमांक - ०६/२०२४-२०२५
स्थायी समिती सभा कामकाजाकरिता प्रशासक सभेची नोटीस

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार विविध कामकाज पार पाडण्यासाठी प्रस्तावित प्रस्तावाना स्थायी समितीची पुर्व मान्यता देणे आवश्यक आहे आणि,

ज्या अर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६, ६(अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका नगरमंडळाची मुदत दि.१९ ऑगस्ट २०२३ रोजी संपुष्टात आलेली असल्याने सद्य:स्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नाही, आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाखाली सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिची सर्व कामे व कर्तव्ये पार पाडण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या प्रशासक पदी आयुक्त,सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांची दि.२४/०८/२०२३ रोजीचे मा.शासन आदेशान्वये नियुक्ती करण्यात आलेली आहे.

त्या अर्थी, स्थायी समितीच्या मान्यतेने पार पाडावयाचे कामकाज पुर्ण करण्यासाठी प्रशासक यांच्या अध्यक्षतेखाली **बुधवार दि.१४/०८/२०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता महानगरपालिका मुख्यालय येथील कै.राजाभाऊ हरिभाऊ जगदाळे सभागृह, सांगली** येथे सभा आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस सर्व संबंधीत अधिकारी यांनी उपस्थित रहावे.

परिशिष्ठ

१. मागील स्थायी समिती प्रशासक सभा दि.०५/०८/२०२४ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. महानगरपालिका क्षेत्रातील कुपवाड मधील स.नं.१९९/६/१ या मनपा खुल्या जागेत चिल्ड्रन पार्क विकसीत करणेकामी झालेल्या जादा कामाच्या रक्कमेस मान्यता देणेकामी **अतिरिक्त आयुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.१२/०८/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

३. सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वर्धापन दिनानिमित्त बालगंधर्व नाट्यगृह मिरज येथे सांस्कृतिक कार्यक्रमाचे अनुषंगाने आवश्यक साहित्याचा पुरवठा करणे अंदाजपत्रकीय र.रु.९८,३००/- मात्रची कामगिरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ संविदा खंड २(२) अन्वये करुन घेणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणेकामी **उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.१४/०८/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

४. सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वर्धापन दिनानिमित्त स्नेह मेळाव्यासाठी आवश्यक साहित्याचा पुरवठा करणे अंदाजपत्रकीय र.रु.९७,८००/- मात्रची कामगिरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ संविदा खंड २(२) अन्वये करुन घेणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणेकामी **उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.१४/०८/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

५. सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेतर्फे हर घर तिरंगा या विषयाबाबत सांस्कृतिक तसेच तिरंगा मेळा व तिरंगा ट्रिब्युट कार्यक्रम तातडीने करणे आवश्यक असल्याने, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ संविदा खंड २(२) चे परंतुकान्वये विनानिविदा SUMIT DANCE ACADEMY, Sangli यांचेकडून कामगिरी करुन घेणेस व त्याकामी येणारे र.रु.९५,०००/- मात्रचे खर्चास तसेच भाग घेतलेल्या मुलांसाठी खाऊ वाटप किरकोळ खर्च र.रु.४०००/- मात्र श्री.शंकर भंडारी प्र.ग्रंथपाल यांचे नावे देणेस असे एकूण र.रु.९९,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेकामी **उपायुक्त मुख्यालय (ग्रंथालय विभाग) यांचे दि.१४/०८/२०२४ चे विषयपत्र.**

६. महानगरपालिकेकडून वेळोवेळी होणाऱ्या गुंतवणूकीचे अंतिम अधिकार प्रदार करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त मुख्यालय (लेखा विभाग) यांचे दि.१४/०८/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

मा.प्रशासक तथा आयुक्तसो यांचे मान्यतेने

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०६/२०२४-२५

स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- २९ **दिनांक** :- १४/०८/२०२४

विषय क्रमांक :- ०१

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांन्वये,

मागील स्थायी समिती प्रशासक सभा दि.०५/०८/२०२४ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.२० ते ठराव क्र.२८ हे वाचून दाखविण्यात आले. सदर कार्यवृत्त वाचून ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती लिपिक

सहाय्यक आयुक्त
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०६/२०२४-२५

स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- ३० **दिनांक :-** १४/०८/२०२४

विषय क्रमांक :- ०२

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांन्वये;

सोबतचे अतिरिक्त आयुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.१२/०८/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेणेत आले.

महापालिका क्षेत्रातील कुपवाड मधील स.नं. १९९/६/१ या मनपा खुल्या जागेत चिल्ड्रन पार्क विकसीत करणे. अंदाजपत्रक र.रु.६८,९४,६००/- मात्रची कामगिरी मा.स्थायी समिती ठराव क्र. ३७ दि. २६/०५/२०२३ अन्वये मक्तेदार आर. के. सर्व्हिसेस, सांगली यांचे नांवे निविदा दराने मंजूर झालेली आहे. सदरचे काम सन २०२२-२३ च्या मंजूर अर्थसंकल्पातील (E-०७७९) जेंडर बजेट महिला बालकल्याण ५% निधी या लेखाशिर्षातील मंजूर तरतूदीमधून होणार आहे.

त्यानुसार मक्तेदार यांना मंजूरीअंती रितसर करारपत्र करुन घेऊन कामाची वर्क ऑर्डर दि.२७/०६/२०२३पासून देणेत आलेली होती.

प्रस्तुत कामगिरी जागेवर अंदाजपत्रकातील तरतूदीप्रमाणे चालू केलेली आहे. तथापि, यापूर्वीचे मंजूर काम हे स.नं. ४७०/४ या ठिकाणी मनपा ओपन स्पेसमध्ये मंजूर होते. सदर ठिकाणी तक्रारी आल्याने व मा.स्थायी समिती ठराव क्र. ३११दि.०४/०८/२०२२ च्या ठरावानुसार स.नं. १९९/१/६ मध्ये यापूर्वी मंजूर असलेले अंदाजपत्रक र.रु.६८,९४,६००/- मात्रच्या रक्कमेमध्ये बसेल तेवढेचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन प्रस्तावित करण्यात आले होते. सदर कामाच्या मंजूर अंदाजपत्रकात ४५६.०० घ.मी. मुरुम व ३०४.०० घ.मी.सीसॅण्ड धरण्यात आली होती. परंतु सदर ओपनस्पेस मध्ये सखल व दलदलीचा भाग असलेने सदरचा ओपनस्पेस पूर्णक्षमतेने मुरुम सीसॅण्ड भराव करणे आवश्यक आहे. जागेवर सदरचे मंजूर काम करणे अडचणीचे आहे. त्यामुळे मंजूर कामाच्या ठिकाणी आवश्यकतेनुसार मुरुम व सीसॅण्ड टाकून कामगिरी करणे आवश्यक आहे.

उपरोक्त कामाचे र.रु.१,६५,७५,११९/- मात्रचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करणेत आले असून त्यास मा.शहर अभियंता यांची तांत्रिक मान्यता घेणेत आलेली आहे. प्रस्तुतची कामगिरी मंजूर मक्तेदार आर. के. सर्व्हिसेस, सांगली यांचेकडून निविदा दराने करुन घेणेस व त्याकामी येणारे खर्च सन २०२४-२५ च्या मंजूर अर्थसंकल्पातील (E-०७७९) जेंडर बजेट महिला बालकल्याण ५% निधीमधून होणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

शहर अभियंता

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०६/२०२४-२५

स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- ३१ **दिनांक :- १४/०८/२०२४**

विषय क्रमांक :- ०३

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांन्वये;

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.१४/०८/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेणेत आले.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वर्धापन दिनानिमित्त बालगंधर्व नाट्यगृह मिरज येथे सांस्कृतिक कार्यक्रमाचे अनुषंगाने आवश्यक साहित्याचा पुरवठा करणे अंदाजपत्रकीय र.रु.९८,३००/- मात्रचे कामी जाहीर निविदा प्रसिध्द करण्यात आली होती, सदर निविदा प्रक्रिये अंतर्गत कामाचा कागदपत्रांचा पहिला लिफाफा व निविदा दराचा दुसरा लिफाफा उघडण्यात आला आहे. याकामी एकुण ०३ निविदा प्राप्त झाल्या असून त्या तीनही निविदा पात्र झाल्या होत्या.

सदर कामी पृथ्वी सर्व्हिसेस सांगली यांची निविदा सर्वात कमी दराची होती, सदर सर्वात कमी दराची निविदा ही अंदाजपत्रकीय दर या दराची प्राप्त झाली होती. त्यानुसार विषयांकित कामगिरी मक्तेदार पृथ्वी सर्व्हिसेस सांगली यांचे नांवे अंदाजपत्रकीय दर या दराने मंजूर झाली आहे.

परंतू विषयांकित कामाची काम मंजुरीची समज देण्यापुर्वी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ ची आचारसंहिता लागू झाल्याने सदर निविदा सुचनांची प्रक्रिया स्थगित ठेवण्यात आली होती. सदरची कामगिरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ५ (२) (२) अन्वये करणेत आलेली असून, तसेच उक्त कामी मंजूरी दि.०५/०८/२०२४ रोजी झालेली असून, सदरची कामगिरी अवलोकनी घेवून, विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

शहर अभियंता

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०६/२०२४-२५

स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- ३२ **दिनांक** :- १४/०८/२०२४

विषय क्रमांक :- ०४

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांन्वये,

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.१४/०८/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेणेत आले.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वर्धापन दिनानिमित्त स्नेह मेळाव्यासाठी आवश्यक साहित्याचा पुरवठा करणे अंदाजपत्रकीय र.रु.९७,८००/- मात्रचे कामी जाहीर निविदा प्रसिध्द करण्यात आली होती, सदर निविदा प्रक्रिये अंतर्गत कामाचा कागदपत्रांचा पहिला लिफाफा व निविदा दराचा दुसरा लिफाफा उघडण्यात आला आहे. याकामी एकुण ०३ निविदा प्राप्त झाल्या असून त्या तीनही निविदा पात्र झाल्या होत्या.

सदर कामी पृथ्वी सर्व्हिसेस सांगली यांची निविदा सर्वात कमी दराची होती, सदर सर्वात कमी दराची निविदा ही अंदाजपत्रकीय दर या दराची प्राप्त झाली होती. त्यानुसार विषयांकित कामगिरी मक्तेदार पृथ्वी सर्व्हिसेस सांगली यांचे नांवे अंदाजपत्रकीय दर या दराने मंजूर झाली आहे.

परंतू विषयांकित कामाची काम मंजुरीची समज देण्यापुर्वी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ ची आचारसंहिता लागू झाल्याने सदर निविदा सुचनांची प्रक्रिया स्थगित ठेवण्यात आली होती. सदरची कामगिरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ५ (२) (२) अन्वये करणेत आलेली असून, तसेच उक्त कामी मंजूरी दि.०५/०८/२०२४ रोजी झालेली असून, सदरची कामगिरी अवलोकनी घेवून, विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

शहर अभियंता

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०६/२०२४-२५

स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- ३३ **दिनांक :-** १४/०८/२०२४

विषय क्रमांक :- ०५

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांन्वये,

सोबतचे उपायुक्त मुख्यालय (ग्रंथालय विभाग) यांचे दि.१४/०८/२०२४ रोजीच विषयपत्र अवलोकनी घेणेत आले.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने मा.सचिव सांस्कृतिक कार्य भारत सरकार नवी दिल्ली यांनी आयोजित केलेल्या दि.०६/०८/२०२२४ रोजी बैठककीस अनुसरुन मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत हर घर तिरंगा म्हणजेच घर घर तिरंगा या कार्यक्रम प्रभावीपणे राबविणेकामी मा.उपायुक्तसो यांचे आदेशानुसार दि.१४/०८/२०२४ रोजी सायं.४ ते ६ पर्यत मनपा क्षेत्रातील सर्व मनपा शाळा व खाजगी शाळेतील विद्यार्थी यांच्या सहभागाने बालगंधर्व नाट्यगृह मिरज येथे कार्यक्रमाचे आयोजन करणेत आलेले आहेत. त्यानुसार खालीलप्रमाणे दर मागविणेत आले त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	पुरवठादार	तपशिल	दिलेला दर
१.	SUMIT DANCE ACADEMY Sangli	स्टेज लाईट व्यवस्था (२० एल ए डी, ४ वार्म एल ए डी स्मोक मशीन, ३ पॉटकॅन, एल ए डी वॉल ८x१२ ऑर्न ४x२ व्हॉग) साऊंड – २ बेस, २ स्टॉप, २ मॉनेटर, ४ माईक, १ निवेदक, १ गायक, २० डान्सर कलाकार टीम, ५ गाणी सादर, बाहेरील बाजू कापडी ६ स्टॉल लावणे	९५,०००/-
२.	इंद्रधनू कलाविष्कार सांगली		९७,०००/-
३.	ABHINAV CREATIONS SANGLI		९७५००/-

उपरोक्त प्रमाणे कामगिरी तातडीने करणे आवश्यक असल्याने, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ संविदा खंड २ (२) चे परंतुकान्वये SUMIT DANCE ACADEMY Sangli यांचेकडून कामगिरी करुन घेणेस व त्याकामी येणारे र.रु.९५,०००/- मात्रचे तसेच प्र.ग्रंथपाल श्री.शंकर भंडारी यांचे नावे किरकोळ खर्च र.रु.४०००/- अशी एकूण र.रु.९९,०००/- मात्रचे खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

ग्रंथालय

सहाय्यक सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०६/२०२४-२५

स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- ३४ **दिनांक :-** १४/०८/२०२४

विषय क्रमांक :- ०६

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांन्वये,

सोबतचे उपायुक्त मुख्यालय (लेखा विभाग) यांचे दि.१४/०८/२०२४ रोजीच विषयपत्र अवलोकनी घेणेत आले.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेस प्राप्त होणारी विविध शासन अनुदान आणि मनपाच्या स्वनिधी रक्कमांपैकी वेळोवेळी काही रक्कम राष्ट्रीयकृत बँकमध्ये ठेव स्वरुपात ठेवणेकामी मा.स्थायी समिती ठराव क्र.१० दि.२६/०४/२०२४ अन्वये गुंतवणूक रक्कमा ठेवणे व रक्कमा काढणे यांचे अधिकार मा.आयुक्तांना देणेत आलेले आहेत.

सबब, यापुढील कालावधीमध्ये महानगरपालिकेस प्राप्त होणारी विविध शासन अनुदान आणि मनपाच्या स्वनिधी खात्यामधून रक्कम काढणे,गुंतवणूक करणे, गुंतवणूक पावती मुदतपूर्व मोडण्याचे तसेच मुदत संपलेनंतर सदर रक्कम पुर्नगुंतवणूक करण्याचे अंतिम मंजुरीचे अधिकारी महानगरपालिका अधिनियमातील कलम ९२ मधील तरतुदीनुसार र.रु.२५ लक्ष पर्यत मा.आयुक्तसो यांचेकडे व र.रु.२५ लक्ष पेक्षा जास्त मा.स्थायी समिती यांचेकडे ठेवणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

ठेरवाधिकारी

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका